नवराष्ट्र

# तरुणांनी देश सेवेसाठी पुढे यावे : श्रीकांत भराटे



उमरगा, (वा.) युवकांनी एनसीसीच्या माध्यमातुन देशसेवेसाठी पुढे यावे एनसीसीतुन लाखो कॅडेटस उतीर्ण होऊन अधिकारी, आर्मी, पोलीस, बीएसएफ, सीआयएसएफ मध्ये भरती होऊन देशसेवा करत आहेत. महाविद्यालयिन जीवनात स्पर्धेच्या तयारीला लागून वर्ग एक चे अधिकारी होऊन देश, समाजाची सेवा करावी, असे मत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शनिवारी महाराष्ट्र, बटालियन एनसीसी लातूर, यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कॅंपच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना भराटे बोलत होते. अध्यक्षस्थानी लेफ्टनंट कर्नल वाय.बी. सिंग, पोलीस उपनिरीक्षकअनुसया, प्रतीक्षा पांगे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले.

CMYK

latur plus Edition

Oct 01, 2024 Page No. 3

Powered by: navbharatlive.com